**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

## प्रेसनोट दिनांक – ३१/०८/२०२४

### दि. ३०/०८/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**<u>भाग १ ते ५ चे गुन्हे</u>**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ३८१/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम - १०९(१),११५(२),३५२,३५१(२),३(५) भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५) महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. २८/०८/२०२४ रोजी २०.०० वा.सुमा.येथील जायका चहा दुकानाचे जवळ सार्वजनिक ठिकाणी अंकुश चौक ओटास्किम निगडी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.३०/०८/२०२४ रोजी ०९/३५ वा |
| फिर्यादी | :- | शमशीद बुंन्दु शहा, वय-२५ वर्षे, व्यवसाय-रिक्षा चालक, रा. पी सी एम सी कॉलणी,बिल्डींग नं ५,रुम नं.१,ओटास्क्रिम, निगडी,पुणे |
| आरोपी | :- | आफसार कुरेशी रा.काळेवाडी, व २ अनोळखी इसम (आफसार कुरेशी याचे मित्र) (पुर्णनाव व पत्ता माहित नाही )**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे चहा पित असताना फिर्यादीचे ओळखीचा इसम नामे नमुद आरोपी यास फिर्यादी यांनी उसणे पैसे दिले नाहीत त्या कारणावरुन चिडुन जावुन फिर्यादीस जिवे ठार मारण्याचे उद्देशाने आरोपी याने त्याचे हातातील लोखंडी कोयता फिर्यादीचे डोक्यात मारुन तसेच नमुद आरोपी याचे दोन मित्रापैकी नाव पत्ता माहित नाही याने लोखंडी रॉडने तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन फिर्यादीस जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला तसेच फिर्यादीस शिवीगाळ, दमदाटी करुन तेथुन पळुन गेले.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि देवरे ७८७५२८७५९८ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ७५६/२०२४ भारतीय न्याय संहिता कमल ३०८(२), ३५२,३५१ (२),(३) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ३०/०८/२०२४ रोजी दुपारी १२/३० वा न्यु ताज बेकरी गांधीनगर पिपरी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि. ३०/०८/२०२४ रोजी २१/४८ वा. |
| फिर्यादी | :- | समला मोहम्मद शेख वय ३८रा बि नं १६चेपाठीमागे भाटनगर पिंपरी पुणे |
| आरोपी | :- | प्रविण कांबळे वय ४५ वर्ष रा गांधीनगर पिंपरी पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे न्यु ताज बेकरी गांधीनगर पिंपरी पुणे एथे बेकरी मध्ये काम करत असताना दुपारी १२/३० वा सुमा नमुद आरोपी हा येवुन फिर्यादीला पावाची लादी दे तेव्हा बेकरी मधील पावाच्या लाद्या संपल्याने फिर्यादी त्याला म्हणालो की थोड्या वेळाने येवुन घेवुन जा या कारणाचा त्यास राग येवुन त्याने फिर्यादीला शिवीगाळ दमदाटी करुन १०००/- रुपयाची खंडणी म्हणुन मागणी केली व पैसे दिले नाहीतर बेकरी पेटवण्याची धमकी दिली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मुदळ ८०८०६१९२८६ |

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ९४६/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०५,३३१(३), ३३१(४) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. २६/०८/२०२४ रोजी रात्री ०२/०० वा. ते दिनांक ३०/०८/२०२४ रोजी सकाळी ०६/०० वा. च्या दरम्यान शांती कॉलनी गल्ली क्र. सी, विजयनगर, काळेवाडी पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि. ३०/०८/२०२४ रोजी २३/०६ वा

फिर्यादी :- भिमा लक्ष्मण धोत्रे,वय ४८ वर्षे, व्यवसाय कॉनट्रॅक्टर,रा. शांती कॉलनी गल्ली क्र. सी, विजयनगर, काळेवाडी पुणे

आरोपी :- अज्ञात चोरटा

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांच्या कुटुंबासोबत तिरुपती बालाजी,आंध्रप्रदेश येथे देवदर्शनासाठी गेले असताना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या घराच्या हॉलच्या मागच्या खिडकीचे लोखंडी ग्रील तोडुन घरामध्ये प्रवेश करुन फिर्यादीच्या घरातुन ५१८ ग्रॅम वजनाचे सोने त्याची रक्कम १९,५६,०००/- रु व ७,००,०००/- रु रोख रक्कम असे एकुण किंमत रुपये २६,५६,००० /- चोरी गेले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि माने ८१०८८८८३५२

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी ३५२/२०२४ भा.द.वी. कलम ४२०,४०६,३४, माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (डी) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१८/०४/२०२४ रोजी पासुनतेदि. ३०/०५/२०२४ रोजीदरम्यान ऑनलाईन पध्दतीनेफिर्यादी यांचे राहते घरी

गुन्हा दाखल :- दि.३०/०८/२०२४ रोजी १२/२३ वा.

फिर्यादी :- महिला फिर्यादी , वय- ५४ वर्षे, व्यवसाय – गृहिणी, रा. पिंपळे निलख, पुणे.

आरोपी :- १.व्हॉटस ॲप नं. +91 9289548924, / +91 9548856981, +91 9630782657, +91 9506520627 , +91 7871918161धारक,
2.https://cc.ppx6.com/4amzws लिंकधारक,
३.व्हॉट्स ॲप गृपHNI Stock Investment Club022, HNI Stock wealth Club 102व्हॉट्स ॲप गृप धारक, ४.गृप ॲडमिन व ॲक्टीव्ह मेंबर व ५.वर नमुद बँक अकाऊंट धारक

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी दि.१८/०४/२०२४ रोजी पासुन ते दि. ३०/०५/२०२४ रोजी दरम्यान दिपक वर्मा व चेतन कारखानीस (प्रोफेसर) यांनी अनुक्रमे व्हॉटस ॲप नं. +91 9289548924 व +91 7871918161 संपर्क करुन व्हॉट्स ॲप गृप HNI Stock Investment Club022, HNI Stock wealth Club १०२ मध्ये ॲड करुन त्यादारे शेअर्स मार्केट मध्ये गुंतवणुकीचे फायदे सांगुन त्यानंतर Etrade कंपनीची लिंक https://cc.ppx6.com/4amzws पाठवुन त्याव्दारे **Etrade** ॲप्लीकेशन डाऊनलोड करण्यास सांगुन त्यामध्ये शेअर्स खरेदी केल्यानंतर जास्तीत जास्त परतावा मिळवुन देण्याचे आमिष दाखवुन फिर्यादी यांना व्हाट्स ॲप व्दारे वर नमुद अकाऊंट देवुन त्यामध्ये एकुण २२,५०,०००/- रुपये गुंतवणुक करण्यास भाग पाडुन नंतर सदरचे पैसे परत काढण्याचा प्रयत्न केला असता परत ते न देता व संपर्क बंद करुन फिर्यादी याचा विश्वासघात करुन त्यांची ऑनलाईन आर्थीक फसवणुक केली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- वपोनि बनसोडे ७८७५०७०२३५

५.

पोस्टे व गु रजि.नं. :- भोसरी एमआयडीसी ४२७/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३(५)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२४ जुन २०२४ रोजी रात्री ०८.३२ ते ३१/०७/२०२४ रोजी दरम्यान, मोशी भोसरी एम आय डी सी, पुणे. येथे

गुन्हा दाखल :- दि.३०/०८/२०२४ रोजी ००.२८ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी, वय ४५ वर्षे धंदा- प्रायवेट नोकरी रा. , मोशी भोसरी एम आय डी सी, पुणे.

आरोपी :- १)मो.क्रं. ७२९४८ ७४८३३ चे व्हॉटस अप धारक स्नेहल कटन्नानी नावाची अनोळखी व्यक्ती

३)फिर्यादी यांनी पैसे पाठविलेले बेनिफिशिअरी बँक अकाऊंट धारक

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी या त्यांचे घरी असताना व्हॉअट्सअॅप धारक स्नेहल कटन्नानी याचा मो.क्रं. ७२९४८ ७४८३३ ने फिर्यादीला ट्रेडींगची माहीती देवुन त्यामधील लिंकद्वारे त्यांचे फिडिलेटी कंपनीचे व्हॉट्सअपवर अॅड करुन त्यांचे ट्रेडींग प्लॅटफॉर्मवर पैसे गुंतवणुक केल्यास १० ते ३० टक्के प्रॉफिट मिळवुन देण्याचे अमिष दाखवुन फिर्यादीला वरील प्रमाणे बँक खात्यावर सदरचे ट्रान्झिकेशन आयडी व्दारे वेगवेगळया बँकेच्या अकाऊंटला एकुण ४०९५०००/- रु भरायला लावुन फिर्यादीचे रक्कमेचा अपहार करुन आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि पठारे ८८८८८१०९५७

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ४९८/२०२४ बी एन.एस.कलम ११८ (२),३५२, प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२५/०७/२०२४ रोजी २१/१५ वाजण्याचा सुमारास बौध्दविहार जवळ भिमश्कती नगर चिखली पुणे.

गुन्हा दाखल :- दि.३०/०८/२०२४ रोजी २२/११ वा

फिर्यादी :- चरण रामदास कांबळे वय ४० वर्षे ,धंदानोकरी, रा.वाघमारेकिराणा स्टोअर्स जवळ,भिमशक्तीनगरझोपडपट्टी चिखली पुणे

आरोपी :- सौदागर भगवाण साळवे रा बौध्द विहार च्या मागेभिमश्कती नगर मोरेवस्ती चिखली पुणे
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्याच्या ओळखीचा इसम नामे पोपट वाघमारे असे बौध्दविहारा समोर ,भिमश्कतीनगर मोरेवस्ती चिखली पुणे. येथे गप्पा मारत उभे असताना तेथेच राहणारा इसम नमुद आरोपी यांने येवुन फिर्यादी यांना तुम्ही एवढया जोराने का बोलता व माझ्याकडे बघुन का हसता असे म्हणुन फिर्यादी व त्याचे सोबत असणारे पोपट वाघमारे यांना शिवीगाळ करुन त्याच्या हातातील लोखंडी रॉडने फिर्यादी यांच्या डाव्या पायाच्या घोटयाच्या वरील बाजुस मारुन गंभीर दुखापत करुन फिर्यादी यांचे पायाचे हाड फॅक्चर करण्यास कारणीभुत झाला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि पंचमुख ८००७७९४९१९

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एम.आय.डी. सी ५८१/२०२४ भारतीय न्याय संहीता कायदा कलम २८१,१२५(ब),१०६ (१) मो.वा का कलम १८४,१३४(अ)(ब)प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२९/०८/२०२४ रोजी २१.०० वा चे सुमारास सैनी कंपनी समोर रोडवर मौजे वासूली ता-खेड

गुन्हा दाखल :- दि.३०/०८/२०२४ रोजी ०८/१७ वा

फिर्यादी :- राजेश कुमार यादव वय ४८ वर्षे व्यवसाय- नोकरी सध्या रा-संदीप नवले यांचे फलॅट मध्ये भाडयाने ग्रीन कोर्ट सोसायटी महाळुंगे ता.खेड

आरोपी :- अज्ञात वाहनावरील अज्ञात चालक

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे कंपनीत काम करणारा कामगार मयत नामे राकेश संतोष झारीया वय.३० वर्षे हे रोड ने पायी चालत जात असताना त्याला कोणत्या तरी अज्ञात वाहण चालक याने त्याचे ताब्यातील वाहण हे अविचाराने निष्काळजीपणे भरधाव वेगाने चालवून राकेश संतोष झारीया वय.३० वर्षे रा.ग्लोरीया अॅल्युमिनीयम प्रा ली कंपनी वासूली ता-खेड जि-पूणे याला जोरीची धडक देवून त्याचे डोक्याला हाता पायाला गंभीर दुखापत करुन त्यास औषधउपचार कामी न नेता अपघात ठिकाणावरुन पळून गेलेने व त्याचे मरणास कारणीभूत झाला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि गिरणार ९८८१०९७७१९

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी ३६०/२०२४ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ (सुधारीत १९९५)कलम ५(अ),५(ब),९ व प्राण्यांना क्रुरतेने वागवण्यास प्रतिबंध अधि. १९६०क ११(१)(च)(झ),भान्यासं २०२३ क ३(५) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.३०/०८/२०२४ रोजी रात्री ००.१५ वा सुमारास थोरल्या पादुका मंदिरा समोर,वडमुखवाडी,आळंदी दिघी रोड,हवेली, |
| गुन्हा दाखल | :- | दि.३०/०८/२०२४ रोजी ०५.५९ वा |
| फिर्यादी | :- | मयुर दत्तात्रय ससार,वय ३२,धंदा नोकरी,रा-कुलकर्णी हॉस्पिटल जवळ,गव्हाणे वस्ती, भोसरी |
| आरोपी | :- | १) तोहफिक नरूल्ला शेख,वय २१,रा मिठानगर,गल्ली नं १,मुकदर अपार्टमेंट,फ्लॅट नं ३०१,कोंढवा,पुणे व मदतनिस<br>२) फरदीन फिरोज शेख,वय १९,रा गल्ली नं ५,लोहीयानगर,पुणे<br>३) महाराज रमेश पवार,रा चाकण<br>४) रामदास भोंडवे (पुर्ण नाव पत्ता माहित नाही)<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी नं १ ते ४ यांनी वाहन क्र एम.एच १४,जी डी ९०५७ अशोक लेलॅण्ड कं टेम्पो याचे गाडीचे मागचा भागात आतमध्ये ०२ जर्सी गाय व ०२ खोंड असे एकुण ०४ गोवंशीय जनावरे कमी जागेत दाटीवाटीने क्रुरपणे रसीने जखडुन बांधलेली होती.तसेच सदर जनावरांना कोणत्याही चारा अगर पाण्याची सोय केलली नव्हती.व ती कत्तलीसाठी घेवुन जातांना मिळुन आले आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि रणवरे ९५५२५५०३१४ |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ९४४/२०२४ भारतीय न्याय संहिता चेकलम ६४,६५ (१),६५(२),७४,३५१(२)(३), सह पोक्सो अधिनियम सन २०१२ चे कलम ४,५(एल)सह ६,८ व १२ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०१ जुन २०२० रोजी ११/४५ वा पासुन ते दि.१५/०८/२०२४ रोजी १०/०० वा पर्यंत |
| गुन्हा दाखल | :- | दि.३०/०८/२०२४ रोजी ०६/१३ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | अनिरुध्द सदाशिव डबीर वय ४२ वर्षे रा. बी -७०, अनमोल रेसिडेन्सी, ॲम्बीयंस हॉटेल, वाकड, पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी हा फिर्यादी यांचे ओळखीचा असुन त्याने नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची मुलगी ,वय १० वर्षे हि अल्पवयीन असल्याचे माहित असताना देखील तीस फोर्सफुली किस करुन तिचे कपडे काढुन लैगिक अत्याचार करुन अश्लिल व्हिडीओ दाखवुन लैगिक अत्याचार करेल असे बोलुन पीडीत मुलगी हिने घाबरुन नकार दिल्यावर पुढच्या वेळेस लैगिक अत्याचार करेल असे बोलुन ''तु जर तुझ्या घरी सांगितले तर, मी तुला व तुझ्या भावाला मारेन'' अशी धमकी देवुन फिर्यादीच्या मुलीच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करुन तिचेवर लैगिंक अत्याचार केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि / गुन्हे गायकवाड, ८३८००३३३६८ |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ९८९/२०२४ भा.न्या.सहीता कलम ७८,७९ लैगींक अत्याचारापासुन बालकाचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ११,१२ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०१/०६/२०२४ रोजी ०७.३० वा पासुन ते दिनांक ३०.०८.२०२४ रोजीचे ०७.३० वा पावेतो उत्तम स्विट |
| गुन्हा दाखल | :- | दि.३०/०८/२०२४ रोजी २३.१६ वा |
| फिर्यादी | :- | अल्पवयीन फिर्यादी मुलगी |
| आरोपी | :- | पुनाराम मोतीची चौधरी,वय ३५ वर्ष,रा.उत्तम स्विट,महाळुंगे पुणे मुळ रा.कोठडी तहसील देसुरी जि.पाली राज्यस्थान **आरोपी अटक नाही** |

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील पिडीत फिर्यादी ही मागील तिन महीण्यापासुन ती तिचे स्कुल बसने स्कुल वाकड येथे जात असतांना उत्तम स्विट मधील आरोपी हा त्याचे दुकानात बसुन पिडीता कोठे बसली आहे पाहुन पिडीताकडे पाहुन फ्लॉईग किस करुन त्याचे हात त्याचे छातीजवळ घेतो व हातावारे करतो.तसेच पिडीता हिस बोलण्याचा प्रयत्न करतो.पिडीता हिस तिचे शाळेत गुड टच बॅड टच बाबत वाकड पोलीस स्टेशनच्या पुनम बारवकर हया माहीती देत असतांना पिडीताने शाळेत सर्वासमोर उत्तम स्विट वाले काका करत असलेल्या हरकती बाबत सांगीतल्याने दोन महीला पोलीस पिडीतेच्या घरी जावुन पिडीताचे वडील यांना उत्तम स्विट येथे घेवुन गेले असता पिडीताने हातवारे करणारे इसमा ओळखल्याने पिडीताचे वडील तिस हिजंवडी पोलीस स्टेशन येथे घेवुन जावुन तक्रार दिली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि झोल, ८२७५३८७४७७

११.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी ९८६/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५), मुंबई पोलीस अधिनियम ३७(१)१३५ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२९/०८/२०२४ रोजी २१/१० वा. कासारासाई ग्रामपंचायत जवळील मोकळया मैदान कासारसाई ता.मुळशी

गुन्हा दाखल :- दि.३०/०८/२०२४ रोजी ०१.५६ वा

फिर्यादी :- कुणाल दिलीप शिंदे,पोलीस हवा.ब.नं.८३३ ,हिंजवडी पोलीस स्टेशन पिंपरी-चिंचवड शहर.

आरोपी :- विशाल दत्तात्रय काकडे,वय-१९ वर्षे,रा.आनंद बोडके यांच्या रुममध्ये भाडयाने बोडकेवाडी माण ता.मुळशी
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा आपले कब्जात ३०,०००/- रूपये किंमतीची गावठी बनावटीचे लोखंडी रिव्हॉल्व्हर व ५००/- रूपये किंमतीचा एक राऊंड विनापरवाना, बेकायदेशीर रित्या जवळ बाळगुन मा.पोलीस आयुक्त सो.पिंपरी-चिंचवड शहर यांचा दिनांक १९/०८/२०२४ रोजीचे प्रतिबंधक आदेशाच्या अन्वये कोणीही इसम विना परवाना सार्वजनिक ठिकाणी कोणतेही शस्त्र,सोटे,भाले,चाकु,सुरा,कोयता,तलवार,दंड-काठया,बंदुका व शरीरीक इजा करता येईल अशी कोणीतीही वस्तु जवळ न बाळगणे असे प्रतिबंधक आदेश असताना सदर आदेशाचा भंग करुन विना परवाना गावठी बनावटीचे पिस्टल व एक राऊंड जवळ बाळगलेला मिळून आला. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि गोमारे , ९९२२७५६८२८

१२.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी ३५४/२०२४, भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३(२५),५(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) सह १३५.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. ३०/०८/२०२४ रोजी १४/१० वा चे सुमारास दत्त आश्रम रोड, दापोडी कडे जाणा-या नविन पुलाच्या बांधकामाच्या खाली जुनी सांगवी पुणे येथे.

गुन्हा दाखल :- दि.३०/०८/२०२४ रोजी १६.५७ वा

फिर्यादी :- विवेक रमेश गायकवाड, वय ३२ वर्षे, पो.हवा.ब.नं.११९४ , नेमणुक सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरीचिंचवड शहर पोलीस आयुक्तालय,पुणे.

आरोपी :- आदित्य महेश डोंगरे,वय २४ वर्षे,रा.सर्वे नंबर ७२, समर्थनगर,नवी सांगवी,पुणे
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने जा.क्र./वि.शा./बंदो/१९५८/२०२४ पिंपरी चिंचवड दि. १९/०८/२०२४ अन्वये मा. पोलीस आयुक्त सा़ो, पिंपरी चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात दि. २०/०८/२०२४ रोजी रात्रौ ००/०१ ते दि. ०२/०९/२०२४ रोजी २४/०० वा.पर्यंत घातक हत्यार बाळगण्यास मनाई असताना त्याने त्याचे कब्जामधे एकुण ७६,५००/- रुपये किंमतीचे मॅगझीन असलेले देशी बनावटीचे ०३ पिस्टल व ०३ जिवंत काडतुस विनापरवाना बेकायदेशीर रित्या अनाधिकाराने विक्रीकरिता जवळ बाळगुन असतानामिळुन आला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि ताकभाते ९२८४६४९१७८